خَيْرُكُمْ مَنْ تَعَلَّمَ الْقُرْآنَ وَعَلَّمَهُ

'' तुमच्यात सर्वोत्कृष्ट मनुष्य तो होय जो क़ुरआनाचे ज्ञानप्राप्त करील व इतरांना त्याची शिकवण देईल। '' (बुख़ारी)

# काय क़ुर्आनास अर्था सह वाचणे आवश्यक नाही ?


लेखकः शम्स पीरज़ादा (रह.)

अनुवाद : मुहम्मद शफी अन्सारी



## इदारा दअ्वतुल क़ुर्आन

५९-मुहम्मद अली रोड, मुम्बई-४०००३

फोन ; 23465005

...... 3rd Edition, March. 2008

...... 2,000

Price Rs. 4/-




# प्रकाशकाचे मनोगत

शैखुल हदीस हज़रत मौलाना मुहम्मद ज़करिया रह.कथन करतात :(१)क़ुरआन म्हणजे संपूर्ण दीन (जीवन पदधती)आहे. त्याचे कायम राहणे व प्रसार यावरच दीन औलंबून आहे. म्हणूनच क़ुरआन शिकणे व शिकविणे याला फार मौलीक महत्व दिले गेले.(२) याच्या अर्थात मन लावून व विचार करून वाचा. (३) जर आपल्याला ज्ञान हवे असेल तर क़ुर्आन पाक च्या अर्थामध्ये मन लावा व विचार करा यामध्ये प्रथम व अन्तिम ज्ञान आहे. (४) क़ुर्आन चांगल्या मधुर आवाजा मध्ये वाचा व त्याच्या अर्था मध्ये विचार करा त्यामूळे तुम्ही चांगल्या मार्गाने जाल. (५)आयाते वईद (चेतावणी) वर माफी व दया मांगा आणि रहमत वर प्रार्थना करा

''मुसलमानांची भलाई याच्यातच आहे की, सर्व सामान्य लोक,क़ुरआनाला समजू शकतील व लहान-थौर सर्व स्तरातील लोक क़ुरआनाच्या अर्थाचा अभ्यास करतील''. (शाह वलीयुल्लाह मुहद्दिस देहलवी रह.)

''क़ुरआन अशा प्रकारे वाचा की ते वाचताना आपल्या हातामध्ये लेखणी घ्या, मन लावा व विचार करा आणि महत्तवाच्या ठिकाणी खूण (Mark) करत चला एक दिवस असा येईल की आपले क़ुर्आन विवीध रेगी दिसेल. (मौलाना मुहम्मद अली जौहर रह.)

''समपूर्ण रात्र क़ुरआन वाचण्या ऐवजी जास्त फ़ायदा अशाने आहे की ऐक-दोन आयातीना अर्थ व उद्दीष्टां सोबत वाचा''.(इमाम ग़ज़ाली रह.)

क़ुरआन अल्लाह कडून मानव जातीसाठी पाठविलेली एक जीवन पदधती आहे, ज्यामध्ये आपल्या ह्या जीवन संसार व मरणोत्तर जीवनाची यशस्वीतेची किल्ली आहे परंतु दुःखदायक बाब ही आहे की आम्ही क़ुरआनाला समजून वाचण्या पासून दूर राहिलो.(मौलाना सय्यद अबुलआला मौदूदी रह.)

अल्लाह सुबहानहू ने क़ुरआन यासाठी अवतरीत केले की त्याचा अर्थ,मतीतार्थ यावर विचार-विनिमय करण्यात यावे. ते केवळ वाचण्या (तिलावत )साठी अवतरीत झालेले नसून समजून वाचण्यासाठी अवतरीत झाले आहे. (अल्लामा शौकानी )

''कुरआन वाचन (तिलावत )करीत असताना अर्थ व विस्तार पुर्वक करा.'' मौलाना मुहम्मद इलयास क़ादरी. मुसन्निफ फ़ैज़ाने सुन्नत

''मिशकातुल मसाबीह'' मध्ये कुर्आनच्या श्रेष्टतेविषयी, एक हदीस मध्ये कथन केले आहे की ''जो कोणी कुरआनाला सोडून अन्य माध्यमातून ''मार्गदर्शन'' प्राप्त करण्याचा प्रयत्न करत असेल तर अल्लाह त्याला ''मार्गभ्रष्ट'' करेल''. हदीसच्या या शब्दांवर विचार करा की, कोणत्या प्रकाराची ''कठोर चेतावणी'' आहे. हे सांगीतले आहे की अल्लाह त्याला ''मार्गभ्रष्ट'' करणार.

या हदीस च्या माध्यमातून आपल्या आचरणाला पारखून बघा की आपण कोणत्या माध्यामातून काय प्राप्त करीत आहोत? ''मार्गभ्रष्टता''(गुमराही)? की मार्गदर्शन (हिदायत)!

काही लोक न समजून इस्लामी शत्रुच्या केटात (Net )फसून स्वताही असे समजतात व लोकानाही समजवितात की कुरआन फक्त विदवान लोकाना समजण्या साठी आहे जर सामान्य माणसानी त्याला समजण्याचा प्रयत्न केला तर तो मार्गभ्रष्ट होतील. केवढी अजीब बाब आहे!

या चुकीच्या प्रपंचाला रद्द करण्यासाठी मौलाना शम्स पीरज़ादा (रह.)नी हे पुस्तक लिहिले. या पुस्तकाचे मराठी, गुजराती,हिंदी व इंग्रजी भाषेत अनुवाद सुदधा प्रकाशित झाले आहेत.

या शिवाय सर्व सामान्यांना कुरआना जवळीक करने व समजून वाचण्याचे प्रलोभन देण्या करिता व ''विस्तार पूर्वक'' ''दअवतुल कुरआन'' प्रत्येक तीन भागावर आधारित उर्दू, मराठी, हिंदी, गुजराती, व इंग्रेजीमध्ये प्रकाशित होत आहे.

आपणास विनंती आहे की ह्या पुस्तकाला ज्यास्तीत ज्यास्त लोकां पर्यंत पोहचवीण्यासाठी मदत करा.

अल्लाह आम्हा सर्वाना कुरआन वाचण्या,समजण्या,त्यांचे अनुकरण करण्या व त्याचे प्रसारण करण्याची शक्ती दे. (आमीन)

मुहम्मद सिद्दीक़ कुरैशी
सेक्रेट्री
इदारा दअ्वतुल कुर्आन
मुंबई-४०০००३



بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

परम कृपाळू परम दयाळू अल्लाहच्या नावाने

मुसलमान या गोष्टीवर ईमान बाळगतात की कुरआन अल्लाहचा ग्रंथ आहे,जो पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर अवतरला व जो देश आणि समाज, स्थळ आणि काळ या कोणत्याही भेदा शिवाय यावच्चंद्र-दिवाकरौ समस्त लोकां करीता स्मरणिका व मार्गदर्शनच नव्हे तर स्वास्थ्य व कृपा देखील आहे. आता या ईमानाची ही निकड होती की मुसलमानांनी कुरआनाशी सुज्ञता पूर्वक संबंध जोडला असता. त्यास स्मजून घेण्याचा प्रयत्न केला असता त्याच्या आयतींवर विचार-चिंतन केले असते, त्यापासून ज्ञानाचा प्रकाश प्राप्त केला असता, त्याचे प्रामाणिकपणे अनुसरण केले असते व त्या जबाबदाऱ्यांना पार पाडले असते, ज्या या ग्रंथाने त्यांच्यावर सोपविल्या आहेत. परंतु मुसलमानांची दशा मोठी विचित्र आहे. या ग्रंथाला समजून घेऊन वाचण्याची त्यांना गरजच भासत नाही, किंबहुना त्यांच्या द्दष्टीने या ग्रंथावर ईमान राखणे व त्याचे पठण करीत राहणे पुरेसे आहे. परिणामतःआचरण दृष्टया त्यांचा कुरआनाशी असलेला संबंध क्षीण व कमकुवत झाला आहे. अल्लाहच्या ग्रंथास व पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम ) यांच्या आचरणास (सुन्नाहला) जी केंद्रीयता प्राप्त व्हावयास हवी होती ती जागा व्यक्तित्वांनी व त्यांच्या ग्रंथांनी घेतली आहे किंवा ते मनाला येईल तसे वागण्यास अगदी स्वतंत्र झाले आहेत आणि ही परीस्थिती अशी नव्हे की यावर एक ओझरता द्दष्टीक्षेप टाकून पुढे जावे, किंबहुना या मागील कारणांची सखोल तपासणी करण्याची व त्या बौध्दिक अडथळयांना दूर सारण्याची गरज आहे ज्या या संदर्भात आढळून येतात.

## अरबी अवगत नसण्याची सबबः

सर्व सामान्यातः लोक असा विचार करतात की कुरआन ज्या अर्थी

अरबी भाषेत आहे,आम्ही अरबी भाषे पासून अनभिज्ञ आहोत,तेव्हा याच्या अर्थ व आशयास जाणण्याचा प्रयत्न करणे आमच्यासाठी आवश्यक नाही. ही सबब अशा स्थितीत मानण्या जोगी असू शकत होती जेव्हा याच्या अर्थ व आशयाला जाणून घेण्याची साधने उपलब्ध राहिली नसती परंतु आज ज्या अर्थी प्रत्येक साधन अस्तित्वात आहे तर ही सबब कसलाअर्थ बाळगते? आजच्या काळात शिक्षण सार्वत्रिक झाले आहे आणि मुद्रणाच्या आधुनिक पध्दतींनी ग्रंथाच्या प्रसारण व प्रकाशना करीता मोठ मोठी साधने उपलब्ध केली आहेत आणि जेथपावेतो पवित्र कुरआनाचा संबंध आहे त्याचाअनुवाद जगातल्या कित्येक भाषांमध्ये केला गेला आहे. तसेच अनेक भाषांमध्ये त्याचे स्पष्टीकरण ही आहे मग यापासून लाभ घेण्यात अडचण कसली? आज माणसाला आपले केरीअर बनविण्यासाठी किती शिकावे लागते. महाविद्यालयाचा एक विधार्थी जेवढी पुस्तके वाचतो व जेवढ्या सखोलपणे त्यांचा अभ्यास करतो, तसेच आपल्या जीवनाचा जो हीस्सा शिक्षण-प्राप्ती साठी खर्च करतो ते किती कठीण काम आहे मात्र हे सर्व काही भौतिक साधने साठी सहन केले जाते परंतु आखिरत चे यश संपादण्या करिता कुरआनाचा अभ्यास करण्या कडे कोणीच लक्ष देत नाही. नि:संशय अल्लाहचा ग्रंथ हाच एक असा ग्रंथ आहे ज्याचे ज्ञान संपादण्या करीता माणसाला वेळच मिळत नाही.खरे तर असे व्हावयास हवे होते की जिथे अनेकविध भाषा शिकून घेतल्या जातात, अरबी भाषा शिकण्याचाही एखादा मार्ग काढला गेला असता ज्यामुळे अल्लाह च्या ग्रंथास सरळ समजून घेण्याची पात्रता निर्माण झाली असती.आणि जेव्हा नमाज मध्ये कुरआन पठण केले जाते तेव्हा त्याचा आशय ही बुद्धीला अवगत होत गेला असता आणि त्याच्या माधुर्याने ईमान पूर्ण कैफीयत निर्माण झाली असती.

लोकांची अवस्था अशी की सकळी उठल्या बरोबर ते वृत्तपत्रांचे वाचन करतात मग आपापल्या अभिरुचीनुसार मासिके व इतर पुस्तकांचा अभ्यास करतात. त्यांना जगभरची पुस्तके वाचण्यास वेळ आहे परंतु



अल्लाहच्या ग्रंथास सानुवादवाचण्यास मात्र अजिबात वेळ नाही. किती आश्चर्यकारक गोष्ट आहे! काय यांना हे शक्य नाही की दररोज फज्र नमाज नंतर अर्धा तास का असेना पवित्र क़ुरआनाचे पठण त्याचा अभ्यास व त्यावर विचार चिंतन करण्यासाठी निश्चित व निर्धारित करुन घ्यावा? ही कसली कार्य-मग्नता की जगातील प्रत्येक गोष्ट समजून घेण्यासाठी सवड आहे परंतु अल्लाहचा ग्रंथ समजून घेण्यासाठी किंचीत मात्र सवड नाही !

जेव्हा एखाद्या माणसाजवळ त्याच्या मित्राचे पत्र एखादद्या अशा भाषेत येते जी त्याला येत नाही, तेव्हा तो एखाद्या जाणकारा कडून वाचवून घेतो. परंतु रब्बुल आलमीन अर्थात सर्व विश्वांच्या पालन कर्त्याने जो संदेश आपल्या दासांच्या नावे पाठविला आहे त्याला जाणून घेण्याची काळजी मात्र त्याला होत नाही.

## काय क़ुरआन केवळ उलमानी समजून घेण्याकरीता आहे?

मुसलमानांचा एक समूह अशी धारणा बाळगतो की क़ुरआन केवळ विद्वानां समजून घेण्याकरीता आहे.राहीलेत सामान्य लोक तर थोर व्यक्तिनी लिहीलेली पुस्तके वाचणे त्यांच्यासाठी पुरेसे आहे. परंतु हा विचार केवळ चुकीचाच नव्हे तर निराधार व क़ुरआनाच्या प्रकाशा पासून लोकांना वंचित ठेवण्यास कारक आहे.किंबहुना लोकांना व्यक्ति पूजेत ग्रसत करण्यास कारणीभूत ही. कोणास हे ठाऊक नाही की पवित्र कुरआनाच्या अवतरणाचा आरंभच اقرأ 'इक़रा'या शब्दाने झाला आहे, याचा अर्थ आहे पढ (वाचा)अर्थात या पढण्याशी अभिप्रेत कुरआनाचेच पढणे होय. तसेच यात अर्थ लक्षात घेऊन पढण्याचा आशय ही सामील आहे कारण कुरआन एक हेतुपूर्ण ग्रंथ आहे ज्याला समजून घेतल्या शिवाय कशा प्रकारे त्याच्या पासून लाभ घेतला जाऊ शकेल?पढण्याचा हा ईश आदेश पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या माध्यमान्वये अशा प्रत्येक माणसा करीता आहे ज्याच्या पर्यंत

कुरआन पोहोचविले गेले आहे मग तो मुस्लिम असो वा मुस्लिमेतर, विशेष लोकां पैकी असो अथवा सामान्य लोकांपैकी आणि विद्वान असो ज्ञानी असो किंवा ज्ञानी नसलेला, यात कोणाला कसले ही प्रामुख्य नाही.

क़ुरआन तर आपल्या अवतरणाचा हेतुच لَعَلَّكُمْ تَعْقِلُوْنَ 'अशासाठी की तुम्ही समजावे' या शब्दात दर्शवितो. यास्तव हा विचार की या ग्रंथास केवळ विद्वानच समजू शकतात नितांत चुकीचा आहे.

कुरआन आपल्या आकलनीयते बांबत सव्त:हे स्पष्टीकरण देतो-

وَلَقَدْيَسَّرْنَا الْقُرْآنَ لِلذِّكْرِ فَهَلْ مِنْ مُّدَّكِرٍ ۔ (سورہ قمر۔۱۷)

'आणि आम्ही कुरआनास उपदेशा करीता सोपे बनविले तेव्हा आहे कोणी बोध ग्रहण करणारा?'

(सूरह कमर-१७)

क़ुरआनाच्या या स्पष्ट निवोदना नंतर ही असे म्हणणे की, हा ग्रंथ केवळ विद्वानांनी समजून घेण्या करीता आहे, तर ही मोठी धारीष्टय पूर्ण बाब होय. वस्तुस्थिति अशी की जो मनुष्य देखील सद्भावने सह क़ुरआनाचा अभ्यास करील, मग तो कितीही अल्प ज्ञान बाळगणारा का असेना, याच्या स्मरणिके पासून लाभ घेतल्या शिवाय राहणार नाही आणि हेच क़ुरआनाचे सर्व प्रथम उद्दिष्ट होय.

وَيُبَيِّنُ اٰيٰتِهٖ لِلنَّاسِ لَعَلَّهُمْ يَتَذَكَّرُوْنَ (سورہ بقر:۲۲۱)

'आणि तो आपल्या आयती (वचन) लोकांकरीता स्पष्टत: निवेदन करतो. अशा साठी की त्यांनी स्मरणिक प्राप्त करावी.'(सूरह बकरा: २२१)

وَلَقَدْضَرَبْنَا لِلنَّاسِ فِى هٰذَا الْقُرْآنِ مِنْ كُلِّ مَثَلٍ لَّعَلَّهُمْ يَتَذَكَّرُوْنَ ۔ (سورۂ زمر۔۲۷)

'आणि आम्ही या कुरआनात लोकां करीता प्रत्येक प्रकारचे उदाहरण निवेदिले, अशा साठी की त्यांनी उपदेश ग्रहण करावा'

(सूरह जुमर: २७)



كَلَّآ اِنَّهٗ تَذْكِرَةٌ فَمَنْ شَآءَ ذَكَرَهٗ (سورۂ مدثر۔ ۵۴۔۵۵)

'नव्हे. ही तर स्मरणिका आहे, तेव्हा ज्याची इच्छा होईल त्याने स्मरणिका प्राप्त करावी.

(सूरह मुदस्सिर-५४,५५)

आणि खरे पाहता क़ुरआन विद्वानां करिताच काय, पण मुसलमानां करीता ही खास करून नाही, किंबहुना तो समस्त मानवां करीता मार्गदर्शक ग्रंथ आहे आणि त्याची निकड अशी की लोकांनी त्याचा अभ्यास करावा व त्यावर विचार चिंतन करावे.

شَهَرُ رَمَضَانَ الَّذِیٓ اُنْزِلَ فِيْهِ الْقُرْآنُ هُدًى لِّلنَّاسِ۔ (سورۂ بقرہ۔۱۸۵)

'रमज़ानचा महीना, ज्यात क़ुरआन अवतरीत केले गेले,जे लोकां करिता मार्गदर्शन आहे.'

(सूरह बकरा: १८५)

كِتَابٌ اَنْزَلْنَاهُ اِلَيْكَ مُبَارَكٌ لِّيَدَّبَّرُوٓا اٰيَاتِهٖ وَلِيَتَذَكَّرَاُولُواالْاَلْبَابِ۔ (سورۂ ص۔۲۹)

'हा समृध्द शाली आम्ही तुमच्यावर अवतरीत केला आहे, अशासाठी की लोकांनी याच्या आयतींवर विचार चिंतन करावे आणि बुध्दिवंतांनी उपदेश ग्रहण करावा.'

(सूरह स्वाद: २९)

اِنَّ الَّذِيْنَ يَكْتُمُوْنَ مَآاَنْزَلْنَا مِنَ الْبَيِّنَاتِ وَالْهُدٰى مِنْ بَعْدِمَا بَيَّنَّاهُ لِلنَّاسِ فِى الْكِتَابِ اُولٰٓئِكَ يَلْعَنُهُمُ اللّٰهُ وَيَلْعَنُهُمُ اللّٰعِنُوْنَ۔ (سورۂ بقرہ۔۱۵۹)

'जे लोक आम्ही अवतरीत केलेल्या स्पष्ट निशाण्या व मार्गदर्शनास लपवितात,जेव्हां आम्ही त्यांचे, ग्रंथात (क़ुरआनात)लोकांसाठी निवेदन केले आहे. अल्लाह त्यांची निर्भत्सना करतो व समस्त निर्भत्सना करणारे ही त्यांची निर्भत्सना करतात.'

(सूरह बकरा:१५९)

اَفَلَا يَتَدَبَّرُوْنَ الْقُرْآنَ اَمْ عَلٰى قُلُوْبٍ اَقْفَالُهَا ۔ (سورۂ محمد ـ ٢٤)

‘काय हे लोक क़ुरआना वर विचार चिंतन करित नाही कि हृदयावर कुंलुपे पडली आहेत?’
(सूरह मुहम्मद: २४)

क़ुरआनात काफिरांना ही आयती ऐकविण्याचा आदेश दिला गेला आहे:

قُلْ تَعَالَوْا اَتْلُ مَا حَرَّمَ رَبُّكُمْ عَلَيْكُمْ ۔ (سورۂ انعام ـ ١٥١)

‘‘सांगा, या, मी तुम्हाला ऐकवू तुमच्या पालन कर्त्याने कोणत्या गोष्टी तुम्हावर हराम (वर्ज्य) केल्या आहेत.’
(सूरह अनआम: १५१)

وَاَنْ اَتْلُوَا الْقُرْآنَ فَمَنِ اهْتَدٰى فَاِنَّمَا يَهْتَدِىْ لِنَفْسِهٖ ۔ (سورۂ نمل ـ ٩٢)

‘(आणि मला हा आदेश दिला गेला आहे की) क़ुरआन वाचुन ऐकवू , जो मार्गदर्शन पत्करील तो आपल्याच भल्या साठी तसे करील.’
(सूरह नम्ल: ९२)

येथपावेतो की ऐन युध्द-प्रसंगी ही जर एखादा अनेकेश्वर वादी अल्लाहची वाणि ऐकण्याच्या उद्देश्याने संरक्षण मागेल तर त्याला संरक्षण देऊन कुरआन ऐकविण्याचा आदेश दिला गेला आहे:

وَاِنْ اَحَدٌ مِّنَ الْمُشْرِكِيْنَ اسْتَجَارَكَ فَاَجِرْهُ حَتّٰى يَسْمَعَ كَلَامَ اللّٰهِ ثُمَّ اَبْلِغْهُ مَاْمَنَهٗ ذٰلِكَ بِاَنَّهُمْ قَوْمٌ لَّا يَعْلَمُوْنَ ۔ (سورۂ توبہ ـ ٦)

‘आणि जर अनेकेश्वर वाद्यांपैकी एखादा मनुष्य तुमच्या जवळ संरक्षण मागेल तर त्याला संरक्षण द्या, येथपावेतो की त्याने अल्लाहची वाणी ऐकावी. मग त्याला त्याच्या शांती स्थळावर पोहचवा.हे अशासाठी की हे लोक जाणत नाहीत’
(सूरह तौबा: ६)

परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की मुसलमानांचा एक गट मुसलमानां



करीताच क़ुरआन आकलनाचे द्वार बंद करु इच्छितो. ते असे म्हणतात की जर लोक क़ुरआनाचा अनुवाद वाचत राहीले तर ते उपद्रवाला (फितन्याला) बळी पडतील. जणू त्यांच्या दृष्टीने अर्थ लक्षात न घेता क़ुरआन वाचत राहिल्याने मुसलमान कोणत्याही फितना वा उपद्रवास बळी पडणार नाहीत, किंबहुना कुरआन अनुवादा सह वाचल्या मुळे त्यांचे उपद्रव ग्रस्त होण्याची भिती अधिक आहे. हा उलट तर्क होय,ज्यास ते सादर करीत आहेत. जर त्यांची ही भिती खरी आहे तर प्रश्न हा उद्‌भवतो की उलमानी कुरआनाचा अनुवाद करण्याचे कष्ट का म्हणून उचलले?काय हे अनुवाद केवल विद्वानांनीच समजून घेण्या करीता किंवा त्यांनीच वाचण्या करीता लिहीले गेलेत? शाह अब्दुल कादिर साहेब, मौलाना महमुदुल हसन साहेब, मौलाना अशरफ अली साहेब थानवी, मौलाना फतेह मुहम्मद साहेब जालंधरी,मुफ्ती मोहम्मद शफी साहेब आणि इतर मान्यवर विद्वानांनी पवित्र क़ुरआनाच्या भाष्य व अनुवादाची जी मौलीक सेवा उर्दू भाषेत पार पाडली आहे त्या द्वारे कोणत्या लोकांना लाभ पोहचविण्याचा त्यांचा उद्देश होता?अरबी जाणणाऱ्यां लोकांना कि उर्दू जाणणाऱ्यां ना? जर या विद्वानांच्या दृष्टीने कुरआनाचा अनुवाद वाचण्यात एखाद्या मार्गभ्रष्टते ची संभावना असती तर त्यांनी मूळातच क़ुरआनाचा अनुवाद केला नसता राहिला भाषांतरांच्या दरम्यान मतभेदाचा प्रश्न,तर अनुवादाच्या निकोपतेविष्यी जर समाधान करुन घेतले गेले आहे तर अनुवादांच्या किरकोळ मतभेदास जो अनुवादकाच्या आकलना नुसार असतो त्यास एवढे महत्व दिले जाऊ शकत नाही की लोकांना हा सल्ला दिला जावा कि त्यांनी मुळातच कुरआनाचा अनुवाद वाचू नये. आज सुशिक्षित मुसलमानांचा एक वर्ग असा देखील निश्चित आहे जो पुरातन व विधमान उर्दू अनुवादांचा लाभ घेत आहे. त्यांच्या या अनुवादासह कुरआन वाचल्याने कोणता फितना निर्माण झाला? मग ज्या लोकांना कुरआनास अनुवादासह वाचविण्यात व ऐकविण्यात फितना जाणवतो,त्यांना बुजुर्गांनी व उलमानी लिहिलेली पुस्तके वाचण्यात व ऐकवण्यात उपद्रव का जाणवत नाही?जेव्हा या पुस्तकांमध्ये अत्याधिक मतभेदाच्या गोष्टी आढळून येतात. काही पुस्तकांमध्ये

तर कमकुवत व प्रमाण दृष्टया, निराधार हदीस वचनांची रेलचेल,थोर बुजुर्गांची अतिशयोक्ति पूर्ण स्तुती, बिनबुडाच्या दंतकथा व गोड समज निर्माण करणाऱ्या स्वप्नांनी इस्लामचे स्वरुप विकृत करुन टाकले आहे. यास्तव गरज या गोष्टीची आहे की आपापल्या समुदायातील विद्वानांच्या पुस्तकांच्या अध्यनाच्या तुलनेत पवित्र क़ुरआनाच्या अभ्यासावर अधिक जोर दिला जावा. पवित्र क़ुरआनाशी लोकांचे नाते जेवढे दृढ होईल, सुधारणेचे कार्य ही तितकेच सोपे होईल. कुरआनास अर्थासह वाचण्याची जेव्हा त्यांना सवय जडेल तेवहा त्यांना ज्ञानाचा प्रकाश लाभेल आणि त्यांच्या संपूर्ण भरवसा माणसांनी लिहीलेल्या पुस्तकांवर राहाणार नाही.

## दीनी इजतिमा दर्से क़ुरआन विरहीत

ही गोष्ट ही मोठी नवलाची आहे कि मसजिदीमध्ये दीनी इजतिमा केले जातात ज्यात बुजुर्ग लोकांची पुस्तके तर मोठ्या इतमामाने वाचली जातात, परंतु क़ुरआन-पाठाचा (दर्स देण्याचा) इतमाम मात्र राखला जात नाही. जर पाठ देण्याकरीता एखादा योग्य मणूस हजर नाही तर कोणत्याही अनुवाद व भाष्या मधून ज्यावर समाधान असावे, वाचून ऐकविले जाऊ शकते. या साठी की अल्लाहची वाणी अर्थ व आशया सह लोकांसमोर यावी आणी ही गोष्टी इतर गोष्टींच्या तुलनेने अधिक लाभदायक व परिणामकारक ठरू शकते. परंतु फजाईलचे वर्णन करणाऱ्यांना क़ुरआणाची ही फजीलत दिसून येत नाही जर एखाद्या ठिकाणी कुरआनाचा दर्स (पाठ) दिला जात असेल तर त्यांना त्यात स्वारस्य नसते. परंतु जर त्यांच्या आपल्या जमाअतीचे एखादे पुस्तक वाचूण ऐकविले जात असेल तर मोठ्या आस्थेने ते ऐकतात. विचार करण्या सारखी गोष्ट आहे की क़ुरआनास कोणते स्थान दिले गेले पाहीजे होते व या लोकांनी कोणते स्थान दिले आहे.

## काय मुस्लिमेतरांना कुरआन अनुवादासह देणे योग्य नव्हे?

जेव्हा धर्म प्रचाराच्या हेतुने पवित्र कुरआन भाष्य व अनुवादा सह मुस्लिमेतरांना सादर केले जाते तर काही लोक यावर आक्षेप घेऊ



लागतात व असे म्हणतात की ज्याअर्थी क़ुरआनास स्पर्श करण्या करिता स्वच्छ शुध्द होणे आवश्यक आहे. म्हणून कुरआन मुस्लिमेतरांच्या हातात देणे योग्य नव्हे. क़ुरआनास स्पर्श करण्या संबंधीचे जे शिष्टाचार ईमान बाळगणाऱ्यां करीता आहेत ते मुस्लिमेतरां करीता असू शकत नाही.समागमा नंतरच्या अपवित्र स्थितीत असलेल्या मुसलमाना ने मसजिदीत प्रवेश करणे योग्य नव्हे,जोपावेतो तो स्नान करीत नाही. परंतु हे बंधन मुस्लिमेतरां करीता असु शकत नाही. यास्तव पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी सुमामा बिन असाल यास जो काफिर होता व जो कैदी बनून आला होता, मसजिदे नबवी मध्ये खांबाशी बांधला गेला होता. अशा प्रकारे कैसर व किसरा यांना जे आवहनात्मक पत्रे पैगंबर(सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी पाठविली होती. त्यात क़ुरआनाच्या आयती समाविष्ट होत्या.तात्पर्य, धर्म-प्रचाराच्या उद्देश्याने क़ुरआनाचा एखादा भाग किंवा संपूर्ण क़ुरआन मुस्लिमेतरांना दिले जाऊ शकते. ते जर क़ुरआनाशी अप्रिय वर्तन करतात तर याची जबाबदारी त्यांच्यावर येते परंतु जर हे माहीत असेल की ते यापासुन लाभ घेण्या ऐवजी याचा अवमान करतलि तर या गोष्टी पासून दूर राहील पाहीजे. आजच्या काळात मुद्रणाच्या प्रगतीने क़ुरआनाचा अनुवाद प्राप्त करण्यास अधिकाधिक सोपे बनविले आहे. मुस्लिमेतर ही सहजगत्या पुस्तक विक्रेत्या कडून याच्या प्रती प्राप्त करू शकतात. तेवहा काय पुस्तक विक्रेत्यांवर या गोष्टीचे बंधन लादले जाईल की त्यांनी मुस्लिमेतरांना कुरआन-अनुवादाची प्रत विकू नये. परिस्थिती अशी आहे की मुस्लिमेतर लोकांच्या छापखान्यात क़ुरआन छापले जाते आणि मुस्लिमेतर प्रकाशन संस्था याला प्रकाशित ही करतात. आता हे सर्व सहन केले जाते परंतु जेथे मुस्लिमेतरांना क़ुरआनाच्या संदेशाशी परिचित करण्यासाठी कुरआनाचा आनुवाद देण्याची गोष्ट निघते तेव्हा मात्र काही लेक आक्षेप घेऊ लागतात. त्यांचा हा आक्षेप इस्लामच्या प्रचार व प्रसार कार्यात अडसर कारक आहे.

# काय कुरआनाची तिलावत (पठण) अज्र (सवाब) ला कारक नाही?

वर जे काही सांगितले गेले त्याचा अर्थ असा मुळीच नव्हे की पवित्र कुरआनाच्या तिलावतीस (पठणास)निरर्थक समजले जावे. कुरआन व हदीस वचनात तिलावत (कुरआन-पठण) व कुरआन हिफज करण्याची जी फजीलत निवेदिली गेली आहे. ती लक्षात घेता आशी गोष्ट बोलणे मोठे धारीष्टय ठरेल. दोन-संदर्भात कमी-जास्ती करण्यापेक्षा समतोल मार्गाचा अवलंब केला पाहीजे. आम्ही या प्रश्नावर तफसीर दअवतुल कुरआन या भाष्यात सूरह अन्कबूतची आयत 'पठण करा या ग्रंथाचे जो तुमच्याकडे वह्य केला गेला आहे' (عنکبوت:۴۵)اُتْلُ مَا اُوحِیَ اِلَیکَ مِنَ الْکِتَاب चे स्पष्टीकरण करतांना जी टीप लिहीली आहे ती या ठिकाणी दिली जात आहे:

सत्य व असत्याच्या या संघर्षात ज्याच्या उल्लेख वर केला गेला आहे पैगंबर(सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना व त्यांच्या माध्यमान्वये त्यांच्या अनुयायींना कुरआन तिलावत (पठण) व नमाज़ कायम करण्याची ताकीद या गोष्टीकडे संकेत करते की जर हे इन्कार करणारे आपले जीवन नष्ट करीत आहे तर करू द्या. तुम्ही आपल्या अंगी तो गुण विशेष निर्माण केला पाहिजे, जो तुमच्या जीवनांना सुशोभित करणारा व तुम्हाला आखिरतचे यश मिळवून देणारा असावा. आणि तो गुण विशेष म्हणजे अल्लाह शी गाढ़ संबंध, आणि अल्लाह शी गाढ़ संबंध कुरआनाच्या तिलावती (पठण)ने व नमाज़चा इतमाम केल्याने निर्माण होतो.

पवित्र कुरआनाच्या पठणाचा पूरेपूर फायदा तर अशाच स्थितीत प्राप्त होऊ शकतो जेव्हा अशा प्रकारे कुरआन पठण केले जावे ज्या प्रकारे कुरआन तिलावत करण्याचा (पठण)चा हक्क आहे يَتْلُونَهٗ حَقَّ تِلَاوَتِهٖ अर्थात सर्वात आधी माणसाचे त्यावर ईमान असावे मग त्यास समजून घेण्याचा प्रयत्न करावा, त्यावष्यी विचार चिंतन करावे,त्यापासून बोध



ग्रहण करावा व त्याच्या मार्गदर्शनास कबूल करीत आपल्या आचरणात्मक जीवनास त्यानुसार घडवावे.पण याचा अर्थ असा नव्हे की अरबी न जाणणाऱ्या मुसलमानाने प्रत्येक वळी अनुवादासह कुरआन वाचावे. असे करणे शक्य नाही,कारण नमाज मध्ये फक्त कुरआन-पठण केले जाते. अनुवाद वाचण्याचा त्या जागी प्रश्नच निर्माण होत नाही, खरी गोष्ट अशी की पवित्र कुरआनचे पठण अल्लाहची वाणी या नात्याने मूळात इबादत होय व अल्लाहच्या सान्निध्याचे फार मोठे साधन,कारण जेव्हा एखाद्या मनुष्य या ग्रंथावर ईमान बाळगून मन:पुर्वक त्याचे पठण करतो तेव्हा तो अल्लाहचे स्मरण करतो आणि अल्लाहच्या वाणीच्या प्रभावाने यावर विनम्रतेचा कैफ चढतो आणि ही फार मोठी अध्यात्मिक संपत्ति होय.यामुळेच त्याच्या प्रत्येक अक्षरा बद्दल मोबदला मिळतो. ऍ यास्तव कुरआन तिलावती-(पठण) च्या महत्वास घटविले जाऊ शकत नाही याचा जेवढा इतमाम केला जाईल तेवढा अधिक मोबदला कारक ठरेल. याचे प्रोत्साहन कुरआनात ही दिले गेले आहे व हदीस-वचनां मध्ये ही राहीलेत ते लोक जे कुरआन-पठण तर खूब करतात पण त्याचा आशय जाणून घेण्याचा कधी प्रयत्न करीत नाही. तर हे असेच आहे जसे नमाज़ लोक पढतात, परंतु हे जाणण्याचा प्रयत्न करीत नाही की ते काय पढतात, येथपावेती की त्यांना सूरह फातिहा व रुकूअ व सुजूद च्या स्तुती-वचनांचा अर्थही माहीत नसतो, आणि ना ते जाणतात की नमाज़ मध्ये ते कोणत्या गोष्टीचा स्वीकार करतात व कोणत्या गोष्टीचा इन्कार. ज्या प्रकारे अशी नमाज़ अदा तर होते, परंतु आपल्या लाभ व बरकती आणि आपल्या मोबदल्याच्या दृष्टीने उणीव पूर्ण असते. तद्वतच कुरआन-पठणा इबादतचा लाभ तर निश्चित घडतो परंतु त्याच्या अर्थ व आशया कडे दुर्लक्ष केल्याच्या परिणामी केवळ इबादतीच्या मोबदल्यात कमी होत नाही तर असा मनुष्य कुरआना पासुन लाभान्वित होऊ शकत नाही. आणि आपल्या आत्मशुध्दी व मार्गदर्शना करीता जो संबंध कुरआनाशी जोडावयास हवा, तो जोडता येत नाही, अर्थात ही फार मोठी वंचितता आहे. काय असे लोक हे

समजतात की सर्वश्रेष्ठ अल्लाह यांना हे विचारणार नाही की जेव्हा अल्लाहचा ग्रंथ तुमच्या जवळ होता तेव्हा तुम्ही त्याला समजून घेण्याचा प्रयत्न का केला नाही? काय हा ग्रंथ केवळ तिलावत (पठण) साठी अवतरित केला गेला होता कि अशासाठी अवतरीत केला गेला होता की तुम्ही यापासून प्रकाश प्राप्त करावा?'

(तफसीर दअवतुल कुरआन- पृ. १४०९)

ज्या लोकांना अर्था शिवाय कुरआन पठण करण्याची सवय जडली आहे त्यांनी या हदीस वचना वर ही विचार करावा ।

لَمْ يَفْقَهُ مَنْ قَرَأَ الْقُرْآنَ فِى اَقَلَّ مِنْ ثَلَاثٍ۔ (ترمذی ابواب القرأت)

'ज्याने तीन दिवसाहून कमी वेळात (पूर्ण) कुरआन वाचले, त्याला काहीच समजले नाही ।

(तिर्मिजी-अबवाबुल किरआत)

उघड आहे,जो मनुष्य देखील तीन दिवसा हून कमी-अवधीत कुरआन संपवीळ, तो अल्लाहच्या वाणी करून ओझरता दृष्टीक्षेप टाकत जाईल व त्याच्या अर्थ व आशया कडे किंचितही लक्ष देणार नाही. एक अरबी जाणणारा मनुष्य देखील जर असेच क़ुरआन पठण करतो तर त्यास उल्लिखित हदीस वचना मध्ये अप्रिय ठरविले गेले आहे. यावरुन ही गोष्ट आपोआप स्पष्ट होते की कुरआन पठणा शी अभिप्रेत केवळ मुखाने शब्दोच्चार करणे नव्हे तर त्यासोबतच त्याला समजण्याचा ही प्रयत्न करणे आहे. तसेच कुरआनाला समजुन घेणेच पुरेसे नाही किंबहुना त्याचे अनुसरण व त्यानुसार आचरण ही आवशयक आहे. कुरआन वारंवार हे स्पष्ट करतो की आखिरतचे यश अशाच लोकांकरीता आहे जे ईमान बाळगुन सदाचरण करतील. म्हणूनच कुरआनाच्या पारंपारिक पठणावर समाधान करणे व त्यास समजून घेण्याचा प्रयत्न करणे व त्यानुसार आचरण न करणे ही फार मोठी नादानी होय. कुरआनात यहूदीना ज्यांना ईश-ग्रंथ धारक बनविले गेले होते, पण ते खऱ्या अर्थाने ग्रंथ धारक बनले नाहीत, म्हणून त्यांना अशागाढवा ची उपमा दिली गेली आहे, ज्यावर पुस्तके लादलेली असावीत.



مَثَلُ الَّذِيْنَ حُمِّلُوا التَّوْرَاةَ ثُمَّ لَمْ يَحْمِلُوْهَا كَمَثَلِ الْحِمَارِ يَحْمِلُ اَسْفَارًا۔ (سورۂ جمعہ۔۵)

'त्या लोकांचे उदाहरण ज्यांना तौरात-धारक बनविले गेले होते मग त्यांनी याचा भार उचलला नाही,अशा गाढवाप्रमाणे आहे, ज्यावर पुस्तके लादलेली असावीत.'

(सूरह जुमुआ-५)

किती खेदजनक बाब आहे की आज कुरआन समजण्याची व त्याचे ज्ञान प्राप्त करण्याची सर्व साधने उपलब्ध असतांना अधिकांश मुसलमान समजल्या विनाच कुरआन-पठण करण्यावर समाधान बाळगून आहेत. कुरआन तर अशासाठी अवतरीत झाले आहे की माणसाने त्यास आपला सूत्रधार बनवावे व त्याच्या प्रकाशात चालत जाऊन आपल्या मरणोत्तर जीवनाच्या यशाची उपाय योजना करावी. परंतु मुसलमानांची दशा अशी की त्यानी यास मृतांना बक्षविण्याचे (अपराध माफ करविण्याचे) साधन बनवून घेतळे आहे. या हेतुसाठी कुरआन-ख्वानी (कुरआन-पठणा) च्या बैठकी आयोजिल्या जातात. काय त्यांच्या कृत्यावर हदीस वचनातील ही तंबी يَفْعَلُوْنَ مَالَا يُؤْمَرُوْنَ ती कामे करतात ज्याचा आदेश याना दिला गेला नाही लागु पडत नाही?

## कुरआन-अध्ययनाचे लाभ

कुरआन-अध्ययना च्या लाभां विषयी काही सांगण्याची गरज नाही परंतु या संदर्भात जी गफलत केली जाते, ती लक्षात घेता काही गोष्टीं कडे संकेत करणे आवश्यक वाटते.

पहिली गोष्ट अशी की क़ुरआन मार्गदर्शक ग्रंथ आहे आणि आजच्या काळात जेव्हा मुसलमानां मध्ये श्रध्दा विषयक मार्गभ्रष्टता सर्वसामान्य झाली आहे, तेव्हा मार्गदर्शनाच्या मुल स्त्रोताकडे रुजू करण्याची व त्यापासून लाभ प्राप्त करणयाची गरज अत्याधिक प्रकर्षाने जाणवते. एकीकडे भौतीकवादी दृष्टीकोनांनी ईश्वर व आखिरत संबंधी सक्त शंका निर्माण केल्या आहेत ज्यामूळे आमचा सुशिक्षित वर्ग वाईटरित्या प्रभावित झाला आहे. दूसरी कडे इस्लाम धर्माच्या विद्वाना मध्ये जिथे

सत्याकडे मार्गदर्शन करणारी मान्यवर व्यक्तिमत्वे आस्तित्वात आहे, तिथे श्रध्दा (अकीदा) संदभति मार्गभ्रष्टता पसरविणाऱ्या उलेमां (विद्वानां)ची कमतरता नाही. अल्लाह ला सोडून अवलीया गौस (फरयादला पोहोंचणारा)व मूश्किलकुशा (संकट निवारक) ठरविणारे उलेमाच (विद्वान) तर होत, यांनी स्पष्टीकरण करून शिर्क ला ही, जो कधीही माफ न केला जाणारा गुन्हा आहे योग्य ठरविले आहे. यास्तव ते असे म्हणतात की अम्ही हे म्हणत नाही की अवलीया गरज पूर्ति करणारे आहेत. किंबहुना सर्वश्रेष्ट अल्लाह ने गरज पूर्ति चे अधिकार यांना देऊन ठेवले आहेत.परंतु जो मनुष्य देखील क़ुरआनाचा सवच्छ बुध्दिने अभ्यास करील तो हे जाणविल्या शिवाय राहू शकणार नाही की हे नितांत असत्य आहे ज्याचा संबंध सर्वश्रेष्ट अल्लाहशी जोडला गेला आहे. कारण क़ुरआनात अवलियाच्या संबंधाने अशी गोष्ट कोठेही निवेदिली गेली नाही. किंबहुना क़ुरआन स्पष्ट:फर्मावित की अल्लाह खेरीज इतरांना गरज पुर्तते साठी पुकारणे पूर्णपणे शिर्क आहे आणि पहिल्याच सूरह (सूरह फातेहा) اِیَّاکَ نَعۡبُدُ وَاِیَّاکَ نَسۡتَعِیۡنُ मध्ये दुआ (प्रर्थाना) ची जी शिकवण दिली गेली आहे ती आहे ''इय्या कनअबुदु व इय्या कनस्तईन''(अम्ही तुझीच उपासना करतो व तुझ्या कडेच मदत मागतो) या प्रार्थनेत ना माध्यम आहे, ना वशिला-परंपु या उलमांनी रणांगणे सज्ज करुन ठेवली आहेत अशा प्रकारे अल्लाह खेरीज ज्यांच्या करीता नियाज़ व नज़राणे, दर्गाह, उर्स, संदल,ग्यारहवी वगैरे बिदअत आणि मोहर्रम चे खिचड़े इत्यादि ची जी शरीअत प्रचलीत केली आहे ती त्या शरीयअतच्या अगदी विपारीत आहे. जिची शिकवण क़ुरआनात तसेच पैगंबरीय सुन्नाह मध्ये दिली गेली आहे. तात्पर्य हे की क़ुरआनाचा अभ्यास करणारा जर सदभावना पूर्वक अभ्यास करतो, मग ते क़ुरआनाच्या अनुवादाच्या मदतीने का असेना, तौहीद (एकेश्वरवाद) ला उजल स्वरुपाते पाहील आणि शिर्क पासून मुक्ति प्राप्त करण्याची सर्वप्रथम अट होय.

दुसरी गोष्ट अशी की क़ुरआनाच्या अध्ययनाने माणसाला ठोस व



सत्यनिष्ट ज्ञान प्राप्त होते. अज्ञान दूर होते व ज्ञानाचा दिव्य प्रकाश त्याला लाभतो. तो आपल्या जीवनाच्या उदिष्टास ही समजू लागतो आणि हे ही जाणू लागतो की त्याच्या जबाबदाऱ्या कोणत्या आहेत. त्याला अल्लाहचा परिचय ही प्राप्त होतो व त्याच्या मनात अल्लाहचे भय देखील निर्माण होते च्या हकीगती आमच्या नजरेला दिसत नाहीत, त्याचे ही ज्ञान प्राप्त होते. आणि त्यांचे अनुसरण करण्याची व त्यांना जीवनात लागू करण्यची चळवळ ही निर्माण होते.

तिसरी गोष्ट अशी की धर्म-संद्रभात केवल जाणणे माणसा करीता पुरेसे ठरत नाही, कारण जाणत असतांनाही मनुष्य इच्छा आकांक्षांच्या आहारी जातो, व गुन्हयाची कामे करु लागतो. त्याला गुन्हयां-पासुन वाचविण्या करीता व सदाचारावर कायम राखण्या करीता वारंवार स्मरणिका व उपदेशाची गरज भासते. क़ुरआनाचा अभ्यास करीत राहहील्याने व स्मरणिका व उपदेशाच्या गोष्टी वारंवार समोर येतात माणसा करीता आपल्या इच्छा-आकांक्षांवर नियंत्रण राखणे सहज सुलभ होते.

चौथी गोष्टी अशी की क़ुरआन मानो-व्याधीं करीता स्वास्थ्य आहे. وَشِفَآءٌ لِّمَا فِی الصُّدُوۡرِ (سورۂ یونس:۵۷) ''आणि हदयात जे (विकार) आहेत,त्यांच्या करीता स्वास्थ्य आहे'' (सूरह युनूस-५७) यास्तव मनात उदभवणारे कुविचार, कुशंका, गर्व-अहंकार, दिखावा, व अपराधा कडे हृदयाची प्रवृत्ती, मत्सर, कपट इत्यादि विकारां पासून मनाला शुध्द करण्याचे चांगल्या व गुणांना निर्माण करण्याचे सर्वोत्कृष्ट साधन क़ुरआन होय. आत्मशुध्दी करीता एखाद्या पीरे तरीकत (सूफी) ची गरज नाही, किबंहुना व पैगंबरीय आचरण चा अभ्यास व त्यांना आत्मसात करणेच पुरेसे आहे.

पाचवी गोष्ट अशी की मानवाची सुधारणा व त्याच्या खऱ्या प्राशिक्षणा साठी सहवासाचा लाभ ही देखील एक महत्वपूर्ण व परिणाम कारक गोष्ट आहे. क़ुरआनाचे वैशिष्टय हे की तो वारंवार पैगंबरांचे वृत्तांत समोर मांडतो. जणू वाचकाला आंबियाच्या बैठकीत

नेतो, यासाठी की त्याने यांच्या पासून सहवास-लाभ (फैजे-सोहबत) घ्यावा. आदर्श चारित्र्य बाळगणांऱ्या या स्वच्छ शुद्ध व्यक्ति चे व्यक्तित्व व त्याच्या महानतेचे अनेकविध पैलू जेव्हा डोळयासमोर येतात तेव्हा कुरआनाचा अभ्यास करणारा प्रभावित झाल्याखेरीज राहात नाही.

परंतु मुसलमानांचा एक गट या गोष्टीवर अधिक जोरदेण्या ऐवजी की कुरआनाचा अभ्यास केला जावा आणि त्यात पैगंबरांचे जे उल्लेख आहेत त्यापासून लाभ घेतला जावा, बुजुर्गां पासून सहवास लाभ (फैजे-सोहबत) प्राप्त करण्यवर जोर देतो. परंतु प्रथम तर बुजुर्गांच्या सहवासाचा लाभ, पैगंबरीच्या त्या सहवास-लाभाचा 'बदल' म्हणून होऊ शकत नाही जो कुरआना द्वारे आम्हाला घडतो. दुसरी असे की आजच्या काळात असे बुजुर्ग मोठया मुश्किली ने मिळतील जे प्रामाणिक, खरी श्रध्दा बाळगणारे, कुरआन निष्ट विचार सरणी असणारे संयमी व सहनशील, अपराधा पासून स्वतःला दूर ठेवणारे, पैगंबर आचरणाचे अनुसरण करणारे, वैयक्तिकव सामूहीक जबाबदाऱ्या पार पाडणारे बिदआत (धर्मबाह्य गोष्टी) व खुराफात (कुरापती) आणि इफरातो तफरित (न्युनाधिकय) पासून स्वतःला अलिप्त ठेवणारे असावेत. आता विचार करा कोटयावधी माणसांना कोणत्या बुजुर्ग जवळ पाठविले जावे, ज्याच्या संगतीत राहणे एक अमलात आणण्या जोगी गोष्ट असावी. मग एका अमलात आणण्या जोगी गोष्टीचे महत्व कमी करुन एका अमलात न आणण्या जोगी गोष्टिवर जोर देण्यात काय लाभ? अर्थात आमच्या कथनाचा असा अर्थ मुळीच नाही की उलमांच्या बुजुर्गांच्या व सदाचारी लोकांच्या सहवासाला (सोहबतीला)लाभ शून्य ठरविले जावे, उलट आमच्या म्हणण्याचा अर्थ असा की सहवास-लाभाचे खरे स्थान पैगंबर होत, ज्याच्या घटना कुरआन अशा प्रकारे निवेदितो की वाचक किंवा श्रोता जणू त्या घटनेचे अवलोकन करीत आहे आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे पवित्र-जीवन जे कुरआन व हदीस संग्रहात सुरक्षित आहे, सहवास लाभाकरीता पुरेसे व लाभप्रद आहे.



सहावी गोष्ट अशी की कुरआन तर रफअत (उच्चता) प्रदान करणारा ग्रंथ आहे. या संदर्भात हदीस वचनातील उल्लेख असा:

إِنَّ اللّٰهَ يَرْفَعُ بِهٰذَا الْكِتَابِ
أَقْوَامًا وَّيَضَعُ بِهٖ اٰخَرِيْنَ-
(مسلم کتاب فضائل القرآن)

'अल्लाह या ग्रंथाद्वारे कितीतरी जन समूहांचे उत्थान करील व किती तरी जन समुहांना अवनत करील'
(मुस्लिम-किताब फजाईलुल कुरआन)

काय ही उच्चता केवल कुरआने नाज़िरह पढल्याने प्राप्त होईल कि ही उच्चता प्राप्त करण्यासाठी कुरआन धारक व ध्वज रोहक बनणे आवश्यक आहे तर ही गोष्ट अशाच स्थितीत होऊ शकते, जेव्हा कुरआनास अर्थासह समजले जावे, त्याचे ज्ञान प्राप्त केले जावे व त्यानुसार आचरण केले जावे.

जर मुसलमान जागृत होतील व कुरआनाशी सुज्ञता पुर्वक संबंध निर्माण करतील तर आपली ही उन्नति साधू शकतात. इतर जन समूहांना ही हे अमृत पाजू शकतात. या जगात ही उच्च मान मर्तबा प्राप्त करु शकतात व आखिरत मध्ये ही यशस्वी होऊ शकतात. सर्व श्रेष्ठ अल्लाह मुसलमानांना याची सुबुद्धि प्रदान करो.

**कुरआनाच्या आवाहना सह उठा**

**आणि**

**लोकांना गफलतीतुन जागे करा.**

**Printed at:**
**Pixel Art Printers f / 19 Match Factory Lane**
**Kurla West Mumbai - 400070**
**Cell : 9820790615**

## क़ुरआन अल्लाह चा ग्रंथ आहे, आणि त्याची नीकड अशी की

✪ आप क़ुरआनाचा अर्थ लक्षात घेऊन त्यास वाचण्याचा इतमाम राखावा. हा इतमाम अशा प्रकारे राखला जाऊ-शकतो की दररोज फज्र नमाजनंतर जास्त नाही तर निदान अर्थ तास क़ुरआन साठी खास करुन द्यावा काही मोजक्या आयती का असेनात, सर्वप्रथम त्यांची तिलावत केली जावी मग त्यांचा अनुवाद वाचला जावा, मग त्यावर विचार चिंतन केले जावे. या संदर्भात एखादया विश्वसनीय भाष्य व अनुवादाची मदत घेतली जावु शकते.

✪ आपल्या मुलांना व कुटुंबियांना क़ुरआन अर्थासह वाचण्याचा प्रोत्साहन दिले जावे व त्यासाठी योग्य ती व्यवस्था केले जावी. क़ुरआन अनुवादाची प्रत प्रत्येक घरात असणे आवश्यक आहे.

✪ मकतब व प्राथमिक दर्जाच्या मदरसा मध्ये शिक्षण दोणरे केवळ क़ुरआन नाज़िरा,(फक्त अरबी) वाचण्याचे शिक्षण देण्यास पुरेसे समजतात. मात्र नात व ईश-स्तुती गीते तोंडपाठ करवितात. जर काही लाहान लाहान सुरती, उदाहरणार्थ सूरह फातिहा, सूरह इखलास व सूरह अस्र अनुवादासह तोंडपाठ करविल्या गेल्यास निदान मुलांवर हा भाव निश्चित पडेल की क़ुरआन अर्थ लक्षात घेऊन वाचण्या जोग ग्रंथ आहे. तसेच सूरह फातिहाचा अनुवाद तर प्रत्येक बालकास तोंडपाठ असला पाहिजे कारण ही नमाज़च्या प्रत्येक रकअतीत पढली जाणारी सुरह आहे.

✪ दर्से-क़ुरआन (क़ुरआन-पाठ) चे बैठकी ठिकठिकाणी कायम केल्या जाव्यात. प्रत्येक मसजिदीत याचा इतमाम केला जावा आणि दीनी इज्तिमा मध्ये यास प्राधान्य दिला जावे. यासाठी की उपस्थितां समोर अल्लाहाची वाणी अर्थ व आशयाससह यावी व अल्लाहच्या ग्रंथास इतर समस्त पुस्तकांवर कृतीपूर्ण श्रेष्ठत्व दिले जावे.

✪ क़ुरआनाच्या अनुवादास (सोपी व सुलभ तफसीर सह असेल तर अधिक चांगले) मुसलमान व इतर लेकांमध्ये अधिकाधिक प्रमाणात प्रसारित करण्याचा प्रयत्न केला जावा, यासाठी की क़ुरआनाचा संदेश घरोघर पोहचावा आणि गाफील लोकांनी सचेत व्हावे, तसेच मुस्लिमेतरांवर आल्लाह चे प्रमाण प्रस्थापित व्हावे जेमुस्लिम उम्मतीच्या अस्तित्वाचे उद्दिष्ट होय.